मंगळवार,
१४ मे २०१९



परभणी : खरबा (ता. मानवत) येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची भेट घेताना समीर दुधगावकर, बाळासाहेब भालेराव व अन्य.

# दुधगावकरांनी घेतली तीन मुलांची जबाबदारी

**» विधायक**

परभणी, ता. १३ (बातमीदार) : खरबा (ता. मानवत) येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या तीन मुलांच्या उज्ज्वल भविष्याची जबाबदारी भाजपचे नेते समीर दुधगावकर यांनी स्वीकारली आहे.

खरबा येथे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाची माहिती कळल्यानंतर समीर दुधगावकर आणि सहकाऱ्यांनी रविवारी (ता. १२) कुटुंबाची भेट घेतली. समीर दुधगावकर यांनी या भेटीदरम्यान, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याबाबत कुटुंबातील इतरांशी चर्चा केली. मधुकर बाळासाहेब पिसे यांच्याकडे भारतीय स्टेटबँक, मध्यवर्ती बँक तसेच खासगी सावकाराचे कर्ज होते. या सर्व प्रश्नाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली. मृत शेतकऱ्याच्या पश्चात पत्नी, आई व तीन मुले आहेत. तसेच त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे तिन्ही मुलांचे परिणामी कुटुंबाचे भविष्य अंधारात जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे कुटुंबातील तिन्ही मुलांना उज्ज्वल भविष्यासाठी, ती मुले स्वतःच्या पायावर उभे राहीपर्यंत त्यांचा शैक्षणिक खर्च उचलण्याची जिम्मेदारी घेण्याचे श्री. दुधगावकर यांनी ठरविले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला शासकीय आर्थिक मदत लवकरात लवकर मिळवून देण्यात मदत करू, असे सांगून कुटुंबाला या बिकट परिस्थितीत धीर दिला. समीर दुधगावकर यांच्यासोबत खरबा येथे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी शिवाजीराव बोबडे, गणेश शिंदे, बाळासाहेब भालेराव, राजेभाऊ काकडे, उद्धव काळे, सुभाष जाधव, देवराव रसाळे, हरिभाऊ शिंदे तसेच इतर गावकरी उपस्थित होते.

# Appreciation by MACCIA for Education industry connect work-






ESTD 1927

MACCIA

Apex Chamber of the State

MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE INDUSTRY & AGRICULTURE

**Certificate of appreciation**

Presented to

Mr. Samir Dudhgaonkar

Vice President &

Chairman- HR, Education & Training Committee

for valuable support and contribution

in the year 2013-2015

| | | |
|---|---|---|
| Ramchandra Bhogale<br>President | Friday, June 12th, 2015 | Shantanu Bhadkamkar<br>Sr. Vice President |

# सौर कृषीपंपासाठी ७५०० कोटींची गरज

## युती सरकारचे स्वप्न तिजोरीला परवडणार कसे?

स्वप्नसीरक कुलश्रेष्ठ, मुंबई



३८ लाख कृषीपंप

# वानर मुक्ती अभियान परभणी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यालय

"वनभवन", एसएससी बोर्डा समोर, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपूरा, औरंगाबाद ४३१००५

Phone No: ०२४०-२३३१२०९/२३४५५०८ E-mail ID ccftabad@mahaforest.gov.in

जा.क्र.कक्ष-३/असं/प्रक्र.१(२०२२-२३)/३५१८/२०२२-२३, दिनांक २० /१२/२०२२

प्रति,

मा. श्री. शिंदे समीर गणेशराव (दुधगांवकर),
भाजपा परभणी जिल्हा उपाध्यक्ष (ग्रामीण), परभणी.

विषय:- वानर मुक्त परभणी प्रकल्पासाठी निधी उपलब्धतेबाबत.

संदर्भ:- १. विवअ (प्रा.), परभणी यांचेकडील पत्र क्र.ब/पववि/लेखा/४८४/२२-२३, दिनांक ०६.०९.२०२२
२. भाजपा परभणी जिल्हा उपाध्यक्ष (ग्रामीण) यांचेकडील पत्र क्र.४६/२२-२३, दि.२७.०९.२०२२
३. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३/असं./६६७/२२-२३, दिनांक ०६.०९.२०२२
४. प्रधान मुख्य वन संरक्षक (अ.नि.व.वि.) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.०२(भाग-२)/१८९/२२-२३, दिनांक ११.१०.२०२२
५. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३/असं./प्र.क्र.१(२२-२३)/२६०१/२२-२३, दिनांक १८.१०.२०२२

विषयांकित प्रकरणी, संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये वनविभाग परभणी विभागांतर्गत वानर पकडून जंगलात सुरक्षित स्थळी सोडण्यात आले आहे. सदर कामाचे मानधन देण्याकरिता अनुदान मागणी नोंदविण्यांत आली होती.

तसेच संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये भाजपा परभणी जिल्हा उपाध्यक्ष (ग्रामीण) यांनी वानराच्या त्रासातुन जनतेची मुक्तता करावी. तसेच सदर कामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यांबाबत कळविले होते.

संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये वानर पकडून जंगलात सुरक्षित स्थळी सोडण्याचे कामाकरिता प्रधान मुख्य वन संरक्षक (अ.नि.व.वि.) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे अनुदानाची मागणी नोंदविण्यांत आली होती.

त्याअनुषंगाने वरील मागणीनुसार संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये अनुदान उपलब्ध करुन देण्यांत आले होते. व या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ५ अन्वये सदर अनुदान विभागीय वन अधिकारी (प्रा.) परभणी यांना उपलब्ध करुन देण्यांत आले. त्याप्रमाणे विभागीय वन अधिकारी (प्रा.) परभणी यांनी कार्यवाही करुन वानर पकडून जंगलात सुरक्षित स्थळी सोडले आहे.

(एस. एम. गुजर)
मुख्य वन संरक्षक
(प्रादेशिक) औरंगाबाद

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी:- विभागीय वन अधिकारी (प्रा.) परभणी यांना माहितीस्तव रवाना.

# ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे ग्राम सक्षमीकरण अभियाना मध्ये आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिलेले पत्र...

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी.


वेबसाईट www.maharashtra.gov.in
www.mahapwd.com
ईमेल - parbhani.ee@mahapwd.gov.in
दु.क्रं. - ०२४५२-२२२७०८

कार्यालय कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परभणी -४३१४०१.
फॅक्स नं. ०२४५२-२२६४७७


जा.क्रं./प्रलि/चौकशी/ 731 दिनांक :- 06 FEB 2023

प्रति,
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
जिंतुर/मुख्यालय, परभणी.

विषय:- झरी ते दुधगांव डांबरीकरण रस्त्याच्या कामा बाबत.

संदर्भ:- श्री.शिंदे समीर गणेशराव (दुधगांवकर) यांचे पत्र जा.क्रं.२०२२-२३/५७, दि.२०/०१/२०२३.

वरील विषयी व संदर्भिय निवेदनाव्दारे या कार्यालयास कळविण्यांत आले की, झरी ते दुधगांव डांबरीकरण रस्त्याचे चालु असलेले काम हे अतिशय निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचे दिसून येत आहे. असे निवेदनात उल्लेख केलेला आहे.

तेंव्हा आपण सदरील रस्त्याची पाहणी करुन अहवाल विभागीय कार्यालयात सादर करावा. तसेच या पत्रा सोबत पत्राची प्रत जोडण्यांत येत आहे.

सहपत्र:- निवेदनाची प्रत-१.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी

प्रत- मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- श्री. शिंदे समिर गणेशराव (दुधगांवकर), परभणी यांना माहितीस्तव.

# नयी शिक्षा नीति के लिए इंडस्ट्री सुझाव देना

ESTD 1927
MACCIA
APEX CHAMBER OF THE STATE

**Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture**

An ISO 9001:2008 Certified Organisation

201, Sarda Sankul, Mahatma Gandhi Path, Nashik - 422 001.• ✆: (0253) 2577704 • Fax: (0253) 2575053
• ✉: nsk@maccia.org.in • 🌐: www.maccia.org.in

MACCIA/89/2016-17/200 Date : 28.10.2016

To,

**Shri. Prakash Javadekar,**
Honourable Minister of Human Resource Development.
Govt of India. New Delhi.

**Sub: 88 Year old Chamber's inputs for National Education policy.**

Respected Sir,

**Greetings on behalf of one of the oldest Chambers of Commerce & Industry in the country!!**

Maharashtra Chamber of Commerce is working closely with authorities since 1927 for growth of industry & trade development. **As industry, with direct & indirect membership of over 5 lakhs business owners,** with many entrepreneurs actively working in global business environment of USA, Europe, Singapore, Australia, **we employ the output of India's education system. We notice the end result of the system and request you to kindly consider the policy suggestions given by Chamber in the right spirit and weightage for New Education Policy.**

**We commend the intent of government to draft a new education policy in sync with today's times.**Based on NEP consultation document and it's themes, with consultations of chamber experts on this matter, **led by Chamber VP Samir Dudhgaonkar** (who has studied in Govt Engg College in India and M.S. Mech Engg in USA), **we hereby** in few-page document, **put forth Industry's ideas, expectations.**

With crimes by educated on the rise (financial & criminal both types of crimes – Ref 3 & 4), depression levels rising ( Ref 1 & 2), challenges of disrespect to womanhood, rise in immoral living (as defined by various current laws of country), we must take up this great opportunity created by Govt of India for influencing youth correctly in their education-stage. **Education system is a powerful means to clarify, debate, understand, motivate& inspire youths for greatness. Only when we have great youth we will become a great country.**

We hope and are confident that these industry views get reflected in the new education policy of India.

**Best wishes!**

**Warm regards,**

**Santosh Mandlecha**
Sr.Vice President

**Head Office** : Oricon House, 6th Floor, Maharashtra Chamber of Commerce Lane, Kala Ghoda, Fort, Mumbai - 400 001.
• ✆:022) 6739 5800 (30 Lines) 2285 5859 / 5860 • Fax : (022) 2285 5861 • ✉: maccia@maccia.org.in • 🌐:www.maccia.org.in

# युवाओं के उज्ज्वल भविष्य निर्माण के लिये

## शिक्षा क्षेत्र को उद्योग जगत के साथ जोडने का 17 फरवरी MoU

**(many of these things are not yet executed as of 12 August 2020, even after regular advocacy from Industry)**









सकाळ | परभणी

नांदेड, शनिवार, १० ऑगस्ट २०१९

# गुप्तेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची मागणी

## पर्यटनमंत्री प्रल्हादसिंग पटेल यांची घेतली भेट

परभणी, ता. ९ (बातमीदार) : येथील भाजप नेते समीर दुधगावकर यांनी सांस्कृतिक पर्यटन मंत्री प्रल्हाद सिंग पटेल यांची मंगळवारी (ता. सहा) भेट घेतली. भेटीदरम्यान, धारासूर (ता. गंगाखेड) येथील मंदिराच्या प्रलंबित प्रकल्पाला तत्वतः मान्यता आणि पुढचे पाऊल घेण्यासंदर्भात मंत्र्यांनी आदेश दिले, अशी माहिती समीर दुधगावकर यांनी दिली.

सांस्कृतिक पर्यटन मंत्री प्रल्हाद सिंग पटेल यांच्याशी भेट घडवून आणण्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांची खूप मदत झाली. मराठवाड्यात दोनच अशी मंदिरे आहेत की, ज्यांचा मूळ कळस आजही शाबूत आहे. एक मंदिर जागजी (जि. उस्मानाबाद) व दुसरे म्हणजे गुप्तेश्वर महादेव मंदिर धारासूर (ता. गंगाखेड, जि. परभणी) येथे आहे. हा मोठा ऐतिहासिक वारसा आहे. हे मंदिर राज्य रक्षित स्मारक म्हणून जाहीर झालेले आहे. स्मारकाचे जतन व दुरुस्तीचे काम शासनामार्फत करण्यात येते. यासाठी पुरातत्त्व विभागाने निधी मंजूर करून देऊन मंदिराचे जतन व दुरुस्तीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे, या संदर्भात मंत्री महोदयांसोबत चर्चा झाली. हेमाडपंथी मंदिराकडे जवळपास एक दशकापासून आजपर्यंत गावकऱ्यांसह नवयुवकांनी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, वेळोवेळी पर्यटन आणि रोजगार वाढावा या दृष्टिकोनातून पाहिले व शासनदरबारी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी वेळोवेळी मदतीची मागणी केली आहे. परंतु, त्यांना अद्याप कोणतीही शासकीय मदत मिळालेली नाही. या ऐतिहासिक वास्तूचा लवकरच जीर्णोद्धार करण्यासाठी प्रयत्न यशस्वी होणार आहेत.

परभणी : धारासूर (ता. गंगाखेड) येथील गुप्तेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार करावा, या मागणीसाठी समीर दुधगावकर यांनी पर्यटन मंत्री प्रल्हादसिंग पटेल यांची भेट घेतली

Bringing industrialists to Parbhani

**Visit to 11th Century temple Gupteshwar Mahadev, Dharasur.**







परभणी

तरुण भारत
www.tarunbharat.org





# परभणीच्या ज्ञानोपासक महाविद्यालय सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जीवनपट चित्र प्रदर्शनीचे उदघाटन

परभणी,/प्रतिनिधी- नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. प्रधानमंत्र्यांच्या जीवनावरील कार्यगौरव चित्र प्रदर्शनाचे उदघाटन स्वातंत्र्य सैनिक विजय जोशी आणि आचार्य देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शिंदे समीर गणेशराव (दुधगांवकर) यांनी केले होते आणि महानगर संयोजक कमलकिशोर अग्रवाल, संजय शिरसागर यांनी नियोजनात मदत होती. ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

प्रदर्शनी २९, ३० आणि १ रोजी सकाळी १० ते रात्री ७ पर्यंत खुली असेल. जीवनपट कार्यगौरव चित्र प्रदर्शनामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आयुष्यातील व त्यांच्या कार्याबद्दल मांडणी आहे. विश्वातील त्यांच्या अतुलनिय कार्याचा आढावा या चित्र प्रदर्शनात मांडला आहे. या चित्र प्रदर्शनाला पूर्णा, मानवत व परभणी तालुक्यातील नागरिकांनी प्रदर्शनी बघून गेले व तसेच इतरत्र ठिकाणाहून अनेक नागरिक, विद्यार्थी, पालक, भेट देत असून चित्रप्रदर्शनाचा लाभ घेत आहेत. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भाजपा जिल्हा पदाधिकारी श्री. एन डी देशमुख, प्रमोद कराड, प्रमोद वाकोडकर, सौ. प्रभावतीताई अन्नपूर्णे व टिम समीर यांनी परिश्रम घेतले, याकेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

सकाळ बुधवार, २२ ऑगस्ट २०१२

# रोजगाराभिमुख कौशल्यवाढ कार्यक्रम राबविणार

## उद्योगाला आवश्यक तंत्रज्ञानाचा समावेश : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे




जालना : येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री राजेश टोपे. या वेळी महेश शिवणकर, समीर दुधगावकर, टिपणीस, डॉ. एस. आर. चितलांगे आदी.

जालना, ता. २१ (बातमीदार) : उद्योगजगताला कोणते तंत्रज्ञान आवश्यक आहे याचा अभ्यास करून तसे अभ्यासक्रम आयटीआय, तंत्रनिकेतन आणि इंजिनिअरिंग महाविद्यालयात शिकविण्याबाबत राज्य शासन विचार करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यातील सर्व शासकीय व खासगी तंत्र महाविद्यालयांत रोजगाराभिमुख कौशल्यवाढ कार्यक्रम राबविण्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी येथे केली.

येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये रविवारी (ता. पाच) महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण महामंडळ; तसेच ऑफिसर्स आणि बोइल्यूडब्ल्यू या कुशल मनुष्यबळनिर्मिती क्षेत्रातील कार्यरत खासगी कंपन्यांच्या मदतीने १० दिवसांच्या विशेष रोजगाराभिमुख कौशल्यवाढ अभ्यासक्रमाचे उद्घाटन टोपे यांच्या हस्ते झाले. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक महेश शिवणकर, प्राचार्य डॉ. एस. आर. चितलांगे, अमित टिपणीस, समीर दुधगावकर, यशोधन कलकडकर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी चितलांगे यांनी या नवीन उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. पुढे बोलताना टोपे म्हणाले, की देशात केलेल्या सर्वेक्षणानुसार बी.ई झालेले २५ टक्के अभियंते बेरोजगार आहेत; मात्र ही संख्या इतर शाखांमध्ये त्यापेक्षा जास्त आहे. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे ते आत्मसात करताना काळाचे भान विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी ठेवले पाहिजे. केवळ नामकी पदवी अथवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन आता थांबता येणार नाही, तर नोकरीस लागण्यासाठी जी तत्त्वे आहेत त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आपण चार लक्ष्य घेऊन कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी; तसेच व्यक्तिमत्त्व विकास व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्यांना शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकासाचे; तसेच इंग्रजी भाषेचे धडे दिले पाहिजेत. याच हेतूने कंपनीतील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून जालना आणि अंबड येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कौशल्यवाढ अभ्यासक्रम १० तास म्हणजेच शनिवारी व रविवारी याकाळात विशेष वर्ग घेण्यात येणार आहेत. त्यासाठी कंपनीचे सात हजार रुपयांचे शुल्क आपण पुढाकार घेऊन केवळ २०० रुपयांवर आणले असल्याचे टोपे म्हणाले. दरम्यान, जालना आणि अंबड येथे हा प्रयोग यशस्वी झाल्यास राज्यातील सर्व शासकीय व खासगी तंत्रनिकेतन; तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयांत असा अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यावर भर देण्याची घोषणा त्यांनी या वेळी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना घाटे यांनी केले.

### राजकारणाच्या पलीकडे...

कौशल्यवाढ कार्यक्रमासाठी ज्यांची मोठी मदत होत आहे ते समीर दुधगावकर हे परभणीचे शिवसेनेचे खासदार गणेशराव दुधगावकर यांचे चिरंजीव आहेत. त्यांनी कुशल मनुष्यबळनिर्मिती क्षेत्रातील उच्चशिक्षण हे अमेरिकेत घेतले आहे. त्याचा उपयोग महाराष्ट्रातील तरुणांना व्हावा, यासाठी ते प्रयत्नशील असल्याने त्यांचे तोंडभरून टोपे यांनी कौतुक केले; तसेच राजकारण बाजूला ठेवूनही काही सकारात्मक करता येते, हे समीरच्या प्रयत्नांतून दिसून येत असल्याचे टोपे म्हणाले.


MAHA NGO FEDERATION
संस्था बैठक
जिल्हा

# Massive Progress (M.P.) साठी

# समीर दुधगांवकर

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।। या उक्तीवर विश्वास म्हणून
जन्मभूमीसाठी अमेरिकेतील संधी नाकारणारा...

Vice President (2014-2018)
**Maharashtra Chamber of Commerce. Estd 1927.**

Consultant - (Innovative Projects of Education.)



## उद्योजक घडविणारा अभियंता-समीर दुधगांवकर





## SD समृद्धी मंच अविरत प्रयत्नरत सर्वांच्या उत्कर्षासाठी

**Our Mission Statement :** To create equal opportunities for each sections of the society and creating prosperity for all via imparting appropriate skills and education. To do this through inclusive growth, with ultimate purpose of everyone's well being. To provide Empowering Help through engagement at all levels for social work.





## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि SD समृद्धी मंचच्या माध्यमातून रोजगाराची संधी





## समीर दुधगांवकर कडुन आभार आणि प्रश्नांची उत्तरे





Proof of above Concept for helping India become Vishwa-Guru

पुढारी




नाशिक : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या पदग्रहण सोहळ्यास उपस्थित मोहन भागवत. समवेत रेल्वेमंत्री सुरेश प्रभू, संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, मावळते अध्यक्ष शंतनू भडकमकर, नवनियुक्त अध्यक्ष संतोष मंडलेचा आदी.

# भारतात विश्वगुरू होण्याची क्षमता

## मोहन भागवत : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स पदग्रहण सोहळा

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

जगातील बहुतांश देशांमध्ये अशांतता व अस्थिरता असून हे वातावरण मानवी विकासासाठी पोषक नाही. सद्यस्थितीत जगापुढे समस्यांचा डोंगर उभा आहे. मात्र, अशा परिस्थितीत भारत हा एकमेव विश्वसनीय देश आहे. उद्योग व व्यवसायाच्या विकासासाठी सर्वात अनुकूल वातावरण भारतात आहे. भारतीय संस्कृतीने जगाला जगण्याची कला दिली असून विश्वगुरू बनण्याची क्षमता भारतात असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चरच्या अध्यक्षपदाचा पदग्रहण सोहळा सोमवारी (दि.२६) मुंबईत पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भागवत 'समृद्ध भारत' या विषयावर बोलत होते. व्यासपीठावर संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, रेल्वेमंत्री सुरेश प्रभू, ललित गांधी, अरविंद जोशी आदी उपस्थित होते. यावेळी चेंबरचे मावळते अध्यक्ष शंतनू भडकमकर यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. भागवत म्हणाले, व्यापार-उद्योगाचा फायदा हा देशाच्या समृद्धीसाठी झाला पाहिजे. भारतात जागतिक महासत्ता बनण्याचे सामर्थ्य आहे. हे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी फक्त उद्योजक अथवा व्यावसायिकांवर नाही, तर समाजालाही हे भव्य स्वप्न साकारण्यासाठी पुढाकार घ्यावा लागणार आहे. प्रगती करीत असताना पर्यावरण हवे की विकास हा यक्षप्रश्न जगापुढे उभा ठाकला आहे. मात्र, भारतीय संस्कृतीने परंपरेचा सन्मान राखत विकासाचे स्वागत केले आहे. या प्रश्नाचे उत्तर व समाधान भारतच जगाला देऊ शकेल. कोणतीही शक्ती भारताला संपवू शकत नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशभरात सुरू असलेल्या शेतकरी प्रश्नावर त्यांनी भाष्य केले. पूर्वीपासून शेतकरी हा हालअपेष्टा सहन करीत आहे. शेतकरी हा कर्तव्य म्हणून शेती करतो. शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा असून, त्याची ताकत मोठी आहे. देशाच्या समृध्दीत शेतीचे योगदान महत्त्वपूर्ण असून, त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. देशभरात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जावी ही मागणी जोर धरत आहे. मात्र, कर्जमाफी हा पर्याय नाही. कर्जमाफीतून शेतकऱ्यांची कायमची सुटका करायची असेल तर कृषीमालाला हमीभाव द्यावा, असे मतही भागवत यांनी यावेळी व्यक्त केले.

### नाशिकमध्ये डिफेन्स क्लस्टरची चाचपणी

केंद्र सरकारने मेक इन इंडिया हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला असून यापुढे सुरक्षा सामग्रीचे देशातच उत्पादन केले जाणार आहे. येथील उद्योगधंद्यांना चालना देऊन रोजगार निर्मिती करणे हा उद्देश आहे. त्याअंतर्गत सुरक्षा सामग्री बनविण्यासाठी नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, पुणे आणि नागपूर या ठिकाणी डिफेन्स क्लस्टर उभारण्याची चाचपणी सुरु असून लवकरच त्याबाबत मोठा निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा संरक्षण राज्यमंत्री डॉ.सुभाष भामरे यांनी सोहळ्यात केली.

# Transformation of Parbhani


**Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture**

Oricon House, 6th Floor, Maharashtra Chamber of Commerce Lane, Kala Ghoda, Fort, Mumbai - 400 001.
: (022) 6739 5800 (30 Lines) 2285 5859 / 5860 • :(022) 2285 5861 • : maccia@maccia.org.in • : www.maccia.org.in

MACCIA 100


जा. क्रमांक : १०४/२०-२१ दिनांक : २०.०८.२०२०

ना. श्री जयंतराव पाटील
मा. जलसंपदा मंत्री
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२

सप्रेम नमस्कार,

विषय : परभणी जिल्हयातील गंगाखेड तालूक्यातील मुळी बंधाऱ्यावरील दरवाजे त्वरीत बसविण्याबाबत

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अॅन्ड अॅग्रिकल्चर ही व्यापार,उद्योग व शेतीच्या विकासासाठी प्रतिनिधीत्व करणारी राज्यस्तरीय शिखर संस्था आहे. राज्यात उद्योग वाढावेत, गुंतवणूक वाढावी यासाठी सातत्याने चेंबर गेली ९३ वर्षे प्रयत्न करीत आहे. राज्यातील उद्योगांना जाणवणाऱ्या अडचणींबाबत चेंबर वेळोवेळी शासनाकडे प्रतिनिधीत्व करीत आहे.

केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करुन योजना राबवित असते. मराठवाड्यातील परभणी जिल्हातील गंगाखेड तालूक्यात मुळी येथे गोदावरी नदीवर मोठा बंधारा बांधला असून त्यामुळे या परिसरातील २५ ते ३० गावांचा सिंचनाचा प्रश्न मार्गी लागला होता. त्यावर स्वयंचलीत दरवाजे बसविण्यात आले होते.

चार वर्षापूवी गोदावरी नदीस आलेल्या महापूरामुळे व पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे मुळी बंधाऱ्याचे दरवाजे तुटले आहेत व ते निकामी झाले आहेत. त्यामुळे गेल्या चार वर्षापासून या बंधाऱ्यात पाणी साठा होत नाही परिणामी शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नाही. सातत्याने पाठपूरावा केल्यानंतर याठिकाणी स्वयंचलीत दरवाजा ऐवजी उचल पध्दतीचे दरवाजे बसविण्याचा निर्णय झाला आहे परंतू अजूनही त्याची अंमलबजावणी होत नाही त्यामुळे हजारे लिटर पाणी या बंधाऱ्यातून दरवाजे नसल्याने वाहून जात आहे.

तरी कृपया आपण याबाबत तातडीने लक्ष घालून मुळी बंधाऱ्यावरील दरवाजे बसविण्यासाठी योग्य ते आदेश संबंधितांस द्यावे व शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करावे अशी विनंती आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित,

संतोष मंडलेचा
अध्यक्ष


MACCIA 100

President
Santosh Mandlecha

Sr. Vice President
Lalit Gandhi
Sec. Gen. (A)
Sagar Nagare

Vice Presidents
Anilkumar Lodha
Shubhangi Tirodkar
Gautam E. Thakur
Umesh Dashrathi
Ravindra Mangave